आदिवासी कक्षाद्वारे अनुसूचीत क्षेत्रांत पथदर्शी प्रकल्पांची अंमलबजावणी ...

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः व्हिआयपी २०१२/प्र.क्र.३७/का.१६**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०५ मार्च, २०१३

वाचा -

१) **शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः आरएजे-१०२२/मुमंस/प्र.क्र.५७/ २०११/ २०-अ, दिनांक ३१/१/१२**
२) **शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्रमांकः व्हिआयपी २०१२/प्र.क्र.३७/का.१६, दिनांक २३/१/२०१३**

प्रस्तावना -

भारतीय संविधानाच्या ५ व्या अनुसूचीत, अनुसूचीत क्षेत्रात मा.राज्यपालांच्या विशेष जबाबदा-या व कर्तव्यांबाबत तरतूदी आहेत. या अनुषंगाने राज्यपाल कार्यालयात "आदिवासी कक्ष" स्थापन करणेबाबत केंद्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने सूचना केली होती. संदर्भ क्र.१ अन्वये मा. राज्यपाल कार्यालयात "आदिवासी कक्ष" स्थापन करण्याबाबत आदेश निर्गमित झाले आहेत. दि. ९ फेब्रुवारी २०११ रोजी यशदा, पुणे येथे आयोजित कार्यशाळेत राज्यपाल कार्यालयातील आदिवासी कक्षाच्या कार्यकक्षेबाबत आदिवासी विकास क्षेत्रात कार्यरत विविध घटकांसोबत चर्चा झाली. आदिवासी कक्षाच्या कामात सुसुत्रता आणणे व त्याला अधिक सक्षम करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेला उपरोक्त संदर्भ क्र. २ वरील शासन निर्णय या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमीत करुन पुढील प्रमाणे सुधारित शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

१. भारतीय संविधानाच्या ५ व्या अनुसूचीतील भाग-अ मधील परिच्छेद-३ नुसार, मा. राज्यपालांनी अनुसूचित क्षेत्राबाबत वार्षिक प्रशासन अहवाल पाठवावयाचे आहेत. भारताच्या महान्यायवादी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार, या वार्षिक अहवालात, मा. राज्यपालांनी केलेल्या मूल्यमापनाचा अंतर्भाव असावा.या अनुषंगाने, अनुसूचित क्षेत्राशी संबंधित विविध मुद्यांबाबत माहिती तसेच अनुसूचित जमातींसाठी राबविलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती दर्शविणारे अहवाल मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची राहील. आदिवासी उप योजनेशी संबंधीत सर्व विभागांनी त्यांच्याद्वारा उपयोजना क्षेत्रात राबविल्या जात असलेल्या कार्यक्रम व योजनांची प्रत्येक आर्थिक वर्षाची माहिती आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक

यांच्याकडे त्या पुढील आर्थिक वर्षाच्या ३१ मे पर्यन्त सादर करणे बंधनकारक राहील. ही माहिती संकलित करुन व आदिवासी विकास विभागाच्या माहितीचा अंतर्भाव करुन एकत्रित माहिती, आर्थिक वर्ष संपल्यापासून ३ महिन्याच्या आत (३० जून पूर्वी) मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडे थेट सादर करणे आवश्यक राहील. वर नमूद केल्याप्रमाणे माहिती संकलित करण्यासाठी, आदिवासी कक्ष प्रपत्र निश्चित करुन आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना कळवेल.

२. आदिवासी उपयोजने अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध योजनांच्या बाबतीत मूल्यमापन व अभ्यास आदिवासी विकास विभागाकडून सुरु आहे. या शिवाय, आवश्यकतेनुसार, आदिवासी कक्ष सुध्दा योजनांच्या बाबतीत सर्वेक्षण व मूल्यमापन करु शकेल. तसेच, आदिवासी कक्ष आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आर्थिक व सामाजिक निर्देशांकांच्या बाबतीत सर्वेक्षण हाती घेऊ शकेल. मूल्यमापन व अभ्यासाचे काम विद्यापीठांचे विभाग, यशदा, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, नामांकित संशोधन संस्था व सक्षम स्वयंसेवी संस्थांना सोपवता येईल. आदिवासी विकास विभाग या प्रयोजनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देईल. निधीची मागणी दरवर्षी अर्थसंकल्पापूर्वी आदिवासी कक्षाने आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांच्या मार्फत आदिवासी विकास विभागाकडे नोंदवणे आवश्यक राहील. एकाच विषयावर दोन यंत्रणाकडून अभ्यास टाळण्यासाठी, आदिवासी विकास विभागाकडून ज्या योजनांचे मूल्यमापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे त्या वगळून इतर आवश्यक योजनांची यादी मा. राज्यपाल यांच्या कार्यालयातील आदिवासी कक्षाकडे पाठवेल.

३. भारतीय संविधानाच्या ५व्या अनुसूचीतील भाग-अ मधील परिच्छेद ३ नुसार मा. राज्यपालांना, अनुसूचित क्षेत्रात शांतता नांदावी व त्याचे शासन सुविहीत व्हावे यासाठी विनियम करण्याचे अधिकार आहेत. सदर विनियम राज्य जनजाती सल्लागार परिषदेशी सल्ल्यानंतर व राष्ट्रपतींच्या मान्यतेने तयार करता येतील. अशा प्रकारचे प्रारुप विनियम मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर, प्रधान सचिव,आदिवासी विकास तथा सदस्य सचिव यांनी तात्काळ जनजाती सल्लागार परिषदेसमोर ठेवून प्रारुप विनियमांबाबत परिषदेचे अभिप्राय प्राप्त करुन मा. राज्यपालांच्या कार्यालयाला कळवावे.

४. आदिवासी कक्षाने आरोग्य, पोषण, अन्न व नागरी पुरवठा (विशेष करुन सार्वजनिक वितरण प्रणाली), शिक्षण, भूमी हक्क, संचार, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, ग्रामसभेमार्फत सूक्ष्म- नियोजन, जीवनोन्नती, समुह संगठन व सक्षमीकरण इत्यादी क्षेत्रामध्ये काही पथदर्शी प्रकल्प घेणेबाबत सुचवले असून, या पथदर्शी प्रकल्पांचे संनियंत्रण करण्याची तयारी दर्शविली आहे. या पथदर्शी प्रकल्पांत यश प्राप्त झाल्यास, राज्यात इतर अनुसूचित क्षेत्रामध्ये ही त्याचे अनुकरण करता येईल. तसेच, या पथदर्शी प्रकल्पांतून प्राप्त अनुभव भारतीय संविधानाच्या ५ व्या अनुसूचीतील परिच्छेद ५(२) मध्ये नमूद विनियम तयार करताना उपयोगी ठरतील. आदिवासी कक्षाने केलेली सूचना शासनाने स्वीकारली असून, सदर पथदर्शी प्रकल्प राबवण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

अ) पथदर्शी प्रकल्प मंजूरी व संनियंत्रण यासाठी खालील समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव (आदिवासी विकास ) | अध्यक्ष |
| २ | मा. राज्यपालांचे सचिव | सह -अध्यक्ष |
| ३ | संबंधित विभागाचे सचिव - | सदस्य |
| ४ | आयुक्त, आदिवासी विकास नाशिक | सदस्य |
| ५ | विभागीय आयुक्त (कोकण, नाशिक, अमरावती व नागपूर पैकी १) | सदस्य |
| ६ | जिल्हाधिकारी ( अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्हयांपैकी १) | सदस्य |
| ७ | मुख्य कार्यकारी अधिकारी ( अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्हयापैकी -२) | सदस्य |
| ८ | मा.राज्यपालांचे उप सचिव (विकास मंडळे ) - | सदस्य सचिव |

अनु.क्र. ५, ६ व ७ वरील सदस्यांची नियुक्ती सह-अध्यक्ष यांनी महसूल व वन विभाग तसेच ग्राम विकास विभागाच्या सल्ल्याने करावी. वरील नियमित सदस्यांच्या व्यतिरिक्त समितीच्या बैठकीत आवश्यकतेनुसार इतर तज्ञ व्यक्तींना निमंत्रित करता येईल.

ब) समितीची बैठक ३ महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. समिती प्रकल्पासाठी आदिवासी क्षेत्राची निवड करेल तसेच प्रकल्पांच्या प्रगतीवर सनियंत्रण करेल.

क) प्रकल्पाच्या क्षेत्रात सामाजिक व आर्थिक निर्देशांकात सुधारणा करणे हा पथदर्शी प्रकल्पांचा उद्देश असावा. सहा महिन्यात पूर्ण होतील असेच प्रकल्प शक्यतो समितीने मंजूर करावेत. सामुहिक हित निर्माण करणा-या प्रकल्पांना प्राधान्य द्यावे.

ड) आदिवासी विकास विभागाकडून पथदर्शी प्रकल्पांसाठी ₹ २ कोटी निधी प्रत्येक आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्यात यावा.

इ) समिती सदस्य, शासकीय विभाग, विकास मंडळे किंवा यशदा यांनी सुचविलेला पथदर्शी प्रकल्प समितीला विचारात घेता येईल. समितीने प्रकल्प अहवाल तपासून मान्यता द्यावी व अंमलबजावणी यंत्रणा निश्चित करावी.

ई) समितीने मान्यता दिल्यानंतर प्रशासकीय मान्यतेचे आदेश आदिवासी विकास विभागामार्फत निर्गमित केले जातील.

उ) समितीने हाती घेतलेल्या पथदर्शी प्रकल्पांबाबत वार्षिक अहवाल प्रसिध्द करावे.

६.या योजनेवरील खर्च मागणी क्र. टी-५ अंतर्गत २२२५डी३६९ अनुसूचीत जाती-जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतुदीतून भागविण्यात येईल. आयुक्त, आदिवासी विकास नाशिक हे यासाठी नियंत्रक अधिकारी राहतील.

६.सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक - ४२५ / व्यय -१४ दिनांक १७.०९.२०१२ व ३३ / व्यय -१४ दिनांक ११.०१.२०१३, महसूल व वन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६ /२०१२/ई -१ दिनांक १२.०७.२०१२ आणि ग्राम विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १४१/ प्र.स. दिनांक ०१.११.२०१२ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०३०५११२७४०३७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH CHANDRA SAGAR

Digitally signed by RAMESH CHANDRA SAGAR
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=MTD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=RAMESH CHANDRA SAGAR
Date: 2013.03.05 12:27:43 +05'30'

**(डॉ. रमेशचंद्र सागर)**
प्रधान सचिव

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री
२. मा. उप मुख्यमंत्री
३. मा. मंत्री (आ.वि.)
४. मा.राज्यपाल यांचे सचिव
५. मा. राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव/सर्व मंत्रालयीन विभाग
८. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर
१०. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर
११. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१२. वित्त विभाग/सेवा-५/वित्तीय सुधारणा-१,व्यय-१४/अर्थसंकल्प-२/१२,मुंबई-३२

१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी /सर्व जिल्हा परिषदा
१६. सर्व उप सचिव (विकास मंडळे)
१७. आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक
१८. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित , नाशिक
२०. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.
२१. महासंचालक यशदा, पुणे
२२. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
२३. सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
२४. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये
२५. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
२६. संचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२७. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई,
२८. आदिवासी विकास विभागातील सर्व कार्यासने
२९. निवड नस्ती/का.१६